**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ८ ते १०/२०१७-१८/ २२८ दिनांक: १६-०६-२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ८,९ व १० /२०१७-२०१८**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. राजाराम श्री. पाटील, मु.पो. ढवळी ता.तासगांव जि. सांगली | **तक्रार** |
| २) | श्री वसंत मा.साळुंखे,शिरढोण, ता.कवठेमहकाळ जि. सांगली | **अर्जदार** |
| ३) | श्री शिवाप्पा गु.हतळळी,जा. बोबलाद,ता.जत जि. सांगली | **(ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभाग सांगली ग्रामिण/कवठेमहांकाळ | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग तासगांव दोन/कवठेमहांकाळ/जत | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**संयुक्त न्यायनिर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१. प्रस्तुतच्या तीन प्रकरणातील तक्रारदार यांनी शेती पंपासाठी त्यांना नविन वीज जोडणी मिळावी आणि झालेल्या विलंबाची भरपाई वि.प.कडून मागितली असून या सर्व प्रकरणांचे स्वरुप समान प्रकारचे असल्याने त्यांचा निर्णय या संयुक्त न्यायनिर्णयाने (Common Judgment) करणेत येत आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

२) केस क्र.८ मधील तक्रारदार श्री राजाराम श्रीरंग पाटील , यांनी त्यांच्या मौजे ढवळी येथील गट क्र.२९० यामध्ये कृषी पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेचा अर्ज सादर करुन दि. २९-०६-२०१३ रोजी अंदाजपत्रकांची रक्कम भरुन सुध्दा विहित मुदतीत वीज जोडणी न मिळाल्याने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे अर्ज सादर केला. सदर कक्षाच्या दि.२०-०३-२०१७ च्या निर्णयावर नाराज होऊन या मंचाकडे अपिल केले आहे.

केस क्र.९ मधील तक्रारदार श्री वसंत मारुती साळुखे यांनी त्यांच्या मौजे शिरढोण येथील गट क्र. ३७५ मध्ये अशीच नविन वीज जोडणी मिळणेचा वि.प.कडे अर्ज सादर करुन दि. २६-०२-२०१५ रोजी कोटेशनची रक्कम जमा केली. त्यांनाही विहीत मुदतीत वीज जोडणी देणेत आली नाही. त्यांना उपरोक्त कक्षाकडे केलेल्या तक्रार अर्जाचा दि. ०६-०४-२०१७ चा निर्णय समाधानकारक न वाटल्याने इकडे मंचाकडे धाव घेतली.

केस क्र.१० मधील तक्रारदार श्री शिवाप्पा गुरुनिंगाप्पा हतळळी यांनी त्यांच्या मौजे जाडर बोबलाद येथील गट क्र. ५७९ च्या जमिनीत अशीच नविन वीज जोडणी मिळणेबद्दल अर्ज सादर करुन कोटेशनची रक्कम दिनांक १७-१०-२०१४ रोजी भरणा केली. त्यांना सुध्दा मुदतीत नविन वीज जोडणी दिली नाही. उपरोक्त कक्षाने त्यांच्या तक्रार अर्जाचा दि. ०१-०४-२०१७ रोजी दिलेला निर्णय त्यांना अमान्य झाल्यामुळे त्यानी या मंचाकडे गा-हाणे दाखल केले आहे.

**वि. प. यांची भूमिका.**

३) सदर तक्रारदार यांना शेती पंपासाठी वीज जोडणी देणेकरिता लघुदाब वाहिनींचे काम करणे जरुर आहे. कोटेशनच्या रकमा भरणा केलेल्या शेतक-यांची प्रतिक्षा यादी प्रलंबित आहे.निधी अभावी लघुदाब वाहिनीची कामे बंद आहेत. सदर तक्रारदार यांना जेष्ठता यादीप्रमाणे वितरण कंपनीच्या नियमानुसार योग्य वेळी वीज जोडणी देण्यात येत आहेत.

४) या तीनही प्रकरणांची सुनावणी दि. १५-०६-२०१७ रोजी या मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी केस क्र. ८ मधील स्वतः तक्रारदार व त्यांचा मुलगा गणेश आणि वि.प. तर्फे उपकार्यकारी अभियंता श्री बी.पी. व्हनमाने हजर होते. केस क्र. ९ मध्ये स्वतःतक्रारदार हजर होते. केस क्र.१० मध्ये तक्रारदार यांचा मुलगा नामे श्रीशैल हजर होते. केस क्र.९ व १० मध्ये वि.प.तर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री आर. एम. शेमडे हजर होते. वरील सर्वाचे तोंडी युक्तिवाद ऐकले. पक्षकारांनी दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रतीचे वाचन करणेत आले आहे.

५) वरील सर्व तक्रारदारतर्फे हजर असलेल्या व्यक्तींनी तोंडी युक्तिवादामध्ये फक्त आणि फक्त कृषी पंपाची नविन वीज जोडणी लौकरात लौकर मिळावी एवढीच विनंती/मागणी या मंचाकडे केली आहे. वरीलपैकी कोणीही विलंबाची भरपाई अगर अन्य प्रकारची नुकसान भरपाई मंचासमोर मागणी केलेली नाही. त्यामुळे, तक्रारदारांनी जरी गा-हाणे अर्जात विलंबाची भरपाई SOP प्रमाणे मागितली असली तरी सुनावणीच्या वेळी त्यांनी सदर मागणी स्वतःहून स्वखुषीने सोडून दिली आहे. असे निश्चितपणे म्हणता येईल. त्यामुळे या निर्णयपत्रात भरपाईच्या मागणी बाबत उहापोह करणेचे कारण रहात नाही.

६) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) उपरोक्त तक्रारदार यांना एका निश्चित कालावधीमध्ये शेती पंपासाठी नवीन वीज जोडणी देण्याचा आदेश वि.प. यांना करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## **कारणमिमांसा**

७) या सर्व प्रकरणांतील तक्रारदार यांनी वर परिच्छेद-२ मध्ये नमूद केलेल्या दिनांकास नविन वीज जोडणीच्या कोटेशनच्या रकमा जमा केल्या याबद्दल वाद नाही. नियमानुसार व कायद्यानुसार त्यांना तीन महिन्यांत वीज जोडणी मिळणे आवश्यक होते. परंतु त्यांना वीज जोडण्या मिळाल्या नसल्याने त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केले होते. सदर कक्षाने , जेष्ठता यादीप्रमाणे वीज पुरवठा करण्यात यावा असे संदिग्ध आदेश केल्यामुळे तक्रारदारांचे समाधान झाले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी सदरची गा-हाणे अनुक्रमे दिनांक १८-०४-२०१७, १८-०४-२०१७ व २७-०४-२०१७ रोजी या मंचासमोर दाखल केली आहेत.

८) विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३प्रमणे आणि कृतीमानके विनियम २०१४ मधील परिशिष्ट अ यातील तरतूदीप्रमाणे एका विशिष्ट कालावधीत वीज पुरवठा सुरु करण्याचे बंधन घातले आहे. त्यानुसार तक्रारदार यांना मुदतीमध्ये वीज जोडणी मिळाली नाही, हे स्पष्ट आहे. विद्यत पुरवठा संहिता विनियम २००५ मधील कलम ४.४ मध्ये "प्रथम येणा-यास प्रथम"या तत्वावर वीज पुरवठा करणेत यावा असे नमूद आहे. परंतु ही तरतूद कायद्यात किंवा विनियमात अन्य तरतूद नसल्यास लागू होईल. शिवाय कलम ४.४ मधील परंतुक अत्यंत स्पष्ट आहे. त्यामुळे सदर कलम ४.४ हे वि.प. यांच्या मदतीस येत नाही. प्रतिक्षा यादीतील क्रमांक किंवा प्रथम येणा-यास प्रथम हे तत्व कायद्यातील स्पष्ट तरतूदी पुढे गौण ठरतात. कृतिमानके विनियमात, वीज जोडणी देण्यात विलंब केल्यास भरपाईची तरतूद आणि विद्युत कायदा कलम ४३ (३) मध्ये दंडाची तरतूद केली आहे. अर्थात , या प्रकरणांमध्ये तक्रारदारांचे प्रतिनिधी यांनी भरपाईची मागणी स्वतःहून मंचासमोर सोडून दिली आहे.

९) वरील सर्व परिस्थितीत, सर्व तक्रारदार हे निश्चित केलेल्या कालमर्यादेत वीज जोडणी मिळणेस पात्र आहेत असे आमचे निष्कर्ष आहेत.

त्यामुळे खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

**आदेश**

१) तक्रारदार श्री राजाराम श्रीरंग पाटील (ग्राहक क्र.२८१९५०००३६२५) यांना दि. ३१-०८-२०१७ पर्यन्त तक्रारदार श्री वसंत मारुती साळुंखे (ग्राहक क्र. २७८९१०००३८५१) यांना दि. १०-०९-२०१७ पर्यन्त आणि तक्रारदार श्री शिवाप्पा गुरुनिंगाप्पा हतळळी (ग्राहक क्र. २७०५१०७१३८०७) यांना दिनांक ३१-०८-२०१७ पर्यन्त त्यांच्या मागणी अर्जानुसार नविन वीज जोडण्या देऊन वीज पुरवठा चालू करावा असा वि.प. यांना आदेश देणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |